॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रोकोली, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर,
शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच
ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २११ वा | शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अफवांच्या बाजारात सर्वसामान्य गॅसवर. !

## देशात ६० दिवस इंधन, तर एका महिन्याचा LPG पुरवठ्याची व्यवस्था

### काही ठिकाणी 'नो स्टॉक'चे बोर्ड

### राज्यातील अनेक भागात पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** इंधन टंचाईच्या भीतीने आधीच गाळण उडालेला सर्वसामान्य नागरीक बाजारातील अफवांमुळे गॅसवर असल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसू लागले आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतात पेट्रोल-डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण होऊन इंधन दरवाढीची अफवा सोशल मीडियावरुन वाऱ्यासारखी पसरली.

यानंतर वाहनधारकांनी पेट्रोल पंपावर गर्दी करत पेट्रोल भरुन घेतले.

यामुळे बुधवारी काही पेट्रोल पंप बंद ठेवण्याची वेळ आली. यावर देशात सुमारे ६० दिवसांचा तेलसाठा असून, एका महिन्याच्या एलपीजी पुरवठ्याची व्यवस्था केली आहे, असे केंद्र सरकारने गुरुवारी स्पष्ट केले. तसेच पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कोणतीही कमतरता नसून कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन केले.

देशभरात पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगांच्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर प्रथमच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने कच्चे तेल, इंधन आणि एलपीजीच्या साठ्याचा तपशील जाहीर केला. त्याचबरोबर, सरकारी मालकीच्या तेल विपणन कंपन्यांनीही पेट्रोल, डिझेल किंवा द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) ची कोणतीही कमतरता नसल्याचे आणि पुरवठा स्थिर असल्याचे सांगितले.

मंत्रालयाने निवेदनात म्हटले की, देशभरातील सर्व पेट्रोल पंपांवर पुरेसा साठा असून ते सामान्यपणे कार्यरत आहेत. पेट्रोल किंवा डिझेलचे रेशनिंग केले जात नाही. विशेषतः लहान शहरांमधील काही पेट्रोल पंपांना इंधन उचलण्यात अडचण येत आहे. यासाठी पेट्रोल पंपांना पूर्वी एका दिवसाऐवजी तीन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी पतपुरवठा (क्रेडिट) वाढवण्याची पावले उचलण्यात आली आहेत.

देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कमतरता नाही. देशातील पेट्रोलियम आणि एलपीजी पुरवठ्याची परिस्थिती पूर्णपणे सुरक्षित आणि नियंत्रणात असल्याचे मंत्रालयाने अधोरेखित केले. इराण युद्धामुळे कच्च्या तेलाच्या अर्ध्या पुरवठ्यात व्यत्यय आला असला तरी, देशाने पुढील ६० दिवसांसाठी इतर ठिकाणाहून पुरेसा कच्च्या तेलाचा पुरवठा सुरक्षित केला आहे.

तसेच, इंधनाच्या टाक्या इष्टतम पातळीवर आहेत आणि त्या दोन महिन्यांची गरज भागवण्यास मदत करू शकतात. देशांतर्गत इंधनाची उपलब्धता संरचनात्मकदृष्ट्या सुनिश्चित केली असून १५० हून अधिक देशांना शुद्ध इंधनाचा पुरवठा सुरू ठेवला आहे. भारताकडे एकूण ७४ दिवसांची कच्च्या तेलाची आणि इंधनाची साठवण क्षमता आहे, असे त्यात म्हटले आहे.

तसेच ८००,००० टन एलपीजीचे कार्गो सुरक्षित करण्यात आले आहेत. एकंदरीत, एका महिन्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. देशांतर्गत उत्पादन वाढल्याने आणि आयातीची गरज कमी झाल्याने एलपीजीचा पुरवठाही पुरेसा आहे. अनेक देशांकडून अतिरिक्त मालवाहू जहाजे मिळवण्यात आली आहेत, ज्यामुळे इंधनाची उपलब्धता स्थिर राहील याची खात्री झाली आहे, असेही मंत्रालयाने म्हटले आहे.

अफवा पसरवला जात असल्याने पेट्रोल पंपावर सकाळपासूनच वाहनधारकांनी मोठी गर्दी केल्याची वस्तूस्थिती आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये पेट्रोल पंपावर वाहनधारकांनी मोठ्या रांगा लावल्या आहेत. पेट्रोल मिळणार नसल्याची भीती त्यांच्या मनात आहे. जालना, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली, सातारा, ठाणे, कल्याण, परभणी, बीड, नांदेड या शहरांमधील पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा बघायला मिळत आहेत. सरकारकडून अगोदरच स्पष्ट करण्यात आले की, पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नाही. देशात पुरेसा साठा उपलब्ध आहे. फक्त राज्यच नाही तर देशभरातील विविध शहरांमध्ये हीच स्थिती कायम आहे.

पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवेने राजभरात खळबळ उडाली. ठाणे-कल्याण-डोंबिवलीत इंधनासाठी नागरिकांची झुंबड उडाली. अनेक पंपांवर परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने 'नो स्टॉक'चे फलक लावण्यात आले. राज्यात गोंधळ आहे, पण मुंबईत शांतता दिसत आहे. मार्बल हिल, देसाई रोड परिसरात पंपांवर शुकशुकाट. यादरम्यानच प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले की, इंधनाचा साठा पुरेसा आहे, नागरिकांनी अफवांना बळी पडू नका.

सोलापुरातील ऑटो एलपीजी गॅस पंप बंद अवस्थेत आहेत. गॅस तुटवड्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील ऑटो एलपीजी गॅस पंप बंद ठेवण्यात आले. शहरातील प्राईम फ्युएल ऑटो एलपीजी पंप बंद करण्यात आलाय. मागील जवळपास 10 दिवसांपासून एलपीजी गॅस पंप आहे बंद. हा एलपीजी पंप बंद असल्याने ऑटो रिक्षा चालकांचे हाल होत आहेत.

## शेतरस्ता अडवला तर आधार कार्ड ब्लॉक, सरकारी योजनाही बंद

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील शेतकरी आणि त्यांच्या शेतीमालाच्या वाहतुकीसाठी बारमाही रस्ते असावेच लागतात, ती काळाची गरज आहे. पण ग्रामीण भागात शेतीच्या वादातून रस्ता अडवल्याचे प्रकार समोर आला आहे.

यावर तोडगा काढण्यासाठी राज्या सरकारकडून कठोर निर्णय घेण्यात आला आहे. आता जर कुणी शेतरस्ता अडवला तर सरकारी योजनेचा लाभ बंद होणार आहे. त्याशिवाय फार्मर आयडी आणि आधार कार्ड ब्लॉक केले जाणार आहे. राज्य सरकारकडून यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' सुरू केली आहे.



'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना'च्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी आणि अडथळे दूर करण्यासाठी आज नवीन सुधारित जीआर जारी करण्यात आला आहे. या नवीन निर्णयामुळे आता शेतरस्ते अडवणारे किंवा सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे,नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना केवळ दंडच होणार नाही, तर त्यांना पुढील ५ वर्षांसाठी सरकारच्या सर्व योजनांपासून वंचित राहावे लागणार आहे.

### शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाई

गाव नकाशावर असलेल्या किंवा सरकारी जागेतील रस्त्यांवर कोणी अतिक्रमण केले असेल, तर तहसीलदार त्यांना ७ दिवसांत अतिक्रमण काढण्याची नोटीस देतील. नोटीसनंतरही जर संबंधित व्यक्तीने स्वतःहून अतिक्रमण काढले नाही, तर तहसीलदार स्वतः ते अतिक्रमण काढून टाकेल. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे, जे लोक रस्त्याचे नुकसान करतील किंवा रस्ता अडवतील, त्यांचे आधार कार्ड आणि फार्मर आय-डी ५ वर्षांसाठी ब्लॉक केला जाईल. त्यांना सरकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ किंवा कोणतीही शासकीय मदत मिळण्यास ५ वर्षांसाठी अपात्र ठरतील.

'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना'नेसाठी कोणतेही सक्तीचे भूसंपादन केले जाणार नाही. जे शेतकरी स्वतःहून जमीन देतील, त्यांना नोंदणीकृत दानपत्र किंवा हक्कसोड पत्र करून देणे अनिवार्य आहे. हे दानपत्र शासनाच्या नावे होत असल्याने, त्यावर लागणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी पूर्णपणे माफ असेल. या जमिनीची नोंद संबंधित शेतकऱ्याच्या ७/१२ उताऱ्यावर घेतली जाईल आणि एकदा दिलेली जमीन शेतकऱ्याला पुन्हा परत मागता येणार नाही.

## तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये दर गुरुवारी मांस विक्री बंद

### नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टींचा घोषणा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरात दर गुरुवारी सर्व प्रकारची मांसविक्री बंद करण्यात येणार असल्याची घोषणा आज नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी सोशल मीडियावर केली. असंख्य स्वामिभक्ता ही मागणी करीत होते. अखेर आज अधिकृत घोषणा नगरपालिकेने केली.

गेल्या अनेक महिन्यांपासून शहरात उघड्यावर होणारी मांसविक्री तसेच दर गुरुवारी सर्व प्रकारच्या मांसविक्रीची दुकाने बंद करण्याची मागणी राज्यभरातील स्वामीभक्त व शहरवासियांकडून होत होती. याचा विचार करून अक्कलकोट नगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक व अधिकारी यांनी निर्णय घेतला. याची अंमलबजावणी गुरुवार, ता. २६ मार्च पासून होणार आहे. उद्या रामनवमी असल्याने चांगला योग आला असून, उद्यापासून प्रत्येक गुरुवारी मांसविक्री बंद ठेवण्याची सूचना नगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शहरातील दुकानदारांना केली आहे.

याबाबत नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की, गुरुवारपासून सर्व प्रकारच्या मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय झाला आहे. शहरातील सर्व प्रकारच्या मांस विक्रीच्या दुकानदारांनी प्रत्येक गुरुवारी आपले दुकान बंद ठेवून नगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**आगामी सभेत मांडणार ठराव**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरातील प्रत्येक गुरुवारी सर्व प्रकारच्या मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याच्या निर्णयाचा ठराव नगरपालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. अशा प्रकारे विक्री बंद ठेवण्याच्या निर्णयाचा ठराव नगरपालिकेत मंजूर करून घ्यावा लागतो. तोपर्यंत या व्यवसायातील बहुतांश बांधवांनी स्वेच्छेने या निर्णयास पाठिंबा दिला आहे.

## जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजी चा तुटवडा नाही, नागरिकांनी घाबरून जाऊ नये - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश दिले आहेत. तरी काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडर साठी लाईन व गर्दी होत असल्याचे दिसून आलेले आहे. तरी गॅस कंपन्यांनी गॅस एजन्सी समोर गर्दी होणार नाही, तेथून गॅस सिलेंडरचा पुरवठा होणार नाही त्याप्रमाणेच अवैध गॅस सिलेंडर विक्री होऊ नये, याबाबत सूचना द्याव्यात. अन्यथा प्रशासनाकडून अशा गॅस एजन्सीवर अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक श्री. रघुकुमार, बीपीसीएलचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण यादव, एचपीसीएलचे सागर चव्हाण व आयओसीएलचे सागर गौतम उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, गॅस कंपन्यांनी गर्दी होत असलेल्या एजन्सींची यादी प्रशासनाला द्यावी. तसेच संबंधित गॅस एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी तेथे येणाऱ्या नागरिकांना गॅस सिलेंडर पुरवठ्याच्या अनुषंगाने अत्यंत सौजन्याने माहिती सांगावी. त्याप्रमाणेच ग्रामीण भागातील एजन्सी समोर गर्दी होत आहे का या अनुषंगाने संबंधित सर्व तहसीलदार यांच्याकडून आवाहल मागविण्यात येत आहे. (पान 2 वर..)

### आवाहन

गॅस कंपनीने दिलेल्या माहितीनुसार गॅस पुरवठा वितरण यामध्ये सुधारणा होत आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर सरासरी साडेचार दिवसात घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा केला जात आहे. तथापि ज्या ठिकाणी बुकिंग झाल्यानंतरही गॅस सिलेंडर मिळण्यास जास्त कालावधी लागत आहे त्या ठिकाणी जास्तीत जास्त गॅस पुरवठा करण्याचे निर्देश गॅस कंपन्यांना देण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात गॅस उपलब्धता पुरेशा प्रमाणात आहे त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. गॅस सिलेंडर साठी गॅस एजन्सी समोर गर्दी करू नये. गॅस एजन्सी येथून गॅस सिलेंडर मिळणार नाहीत. ऑनलाइन बुकिंग झाल्यानंतर विहित वेळेत आपल्याला घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा होणार आहे, नागरिकांनी याची नोंद घ्यावी व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

प्रारंभी तिन्ही गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून त्यांना उपलब्ध होत असलेल्या एलपीजी गॅस बाबतची माहिती बैठकीत दिली. तसेच काही ठिकाणी नागरिकांना सूचना देऊनही गॅस सिलेंडर साठी तसेच माहितीसाठी नागरिकांकडून गर्दी होत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी पीएम उज्वला गॅस योजनेतून 45 दिवसात गॅस सिलेंडर उपलब्ध होत आहे, अशी माहिती दिली.

## राज्यात ३०-३१ मार्च दरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

दि. ३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा



कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## सर्वसामान्यांना मोठा दिलासा! १ एप्रिलपासून वीज दरात कपात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सर्वसामान्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील वीज ग्राहकांसाठी नवीन आर्थिक वर्ष दिलासादायक ठरणार आहे.

राज्यभरातील वीज दरांमध्ये कपात करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून नवीन दर लागू होणार आहेत. महावितरण, बेस्ट, अदानी आणि टाटा पॉवर या कंपन्यांनी घरगुती वीज दरांमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.



विशेषतः बेस्ट प्रशासनाने कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी सर्वात स्वस्त दरात वीज देण्याचा निर्णय घेतलाय.

महावितरण, अदानी, बेस्ट आणि टाटा या वीज वितरण कंपन्यांनीच नवीन वीजदर लागू करण्याबाबत एक प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाकडे पाठवला होता. या प्रस्तावाला राज्य वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली. या मंजुरीनंतर वीज दरात कपात करण्यात आली आहे. त्यामुळे महागाईमुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**१ एप्रिलपासून वीज बिल किती आकारले जाणार?**

२०२६-२७ या आर्थिक वर्षात ० ते १०० युनीटसाठी ४.३ रुपये द्यावे लागणार आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी याच युनीटसाठी ४.७६ रुपये द्यावे लागत होते. म्हणजेच वीज दरात ९.७ टक्के कपात करण्यात आली आहे.

२०२६-२७ या आर्थिक वर्षात १०१ ते ३०० युनीटसाठी ७.१ रुपये द्यावे लागणार आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी याच युनीटसाठी ७.९६ रुपये द्यावे लागत होते. म्हणजेच वीज दरात १०.८ टक्के कपात केली आहे.

२०२६-२७ या आर्थिक वर्षात ३०१ ते ५०० युनीटसाठी ११.६४ रुपये द्यावे लागणार आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी याच युनीटसाठी १३.५५ रुपये द्यावे लागत होते. म्हणजेच वीज दरात १४ टक्के कपात करण्यात आली आहे.

तर, २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५०० पेक्षा युनीटसाठी १२.६४ रुपये द्यावे लागणार आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी याच युनीटसाठी १४.५५ रुपये द्यावे लागत होते. म्हणजेच वीज दरात १३.१ टक्के कपात करण्यात आली आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्धवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी
ताः औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार
SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार
SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# 'विचारमंथनाचे सभागृह' न राहता 'सत्तेच्या सोयीचे साधन'

विधान परिषदेतील निर्णयांचा गोंधळ अधिकार, कायदा आणि राजकारणाचा संघर्ष महाराष्ट्र पहात आहे. राज्याच्या विधान परिषदेतील अलीकडील घडामोडींनी संसदीय परंपरा, कायदेशीर प्रक्रिया आणि राजकीय हस्तक्षेप याबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. तुषार दोशी यांच्या निलंबन आणि त्यानंतरच्या रद्दबातल आदेशाभोवती निर्माण झालेला वाद हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर बोट ठेवणारा आहे.

शिंदे शिवसेनेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी तुषार दोशी यांच्या निलंबनाचा आदेश दिला. या निर्णयामागे संभूराजे देसाई मंत्र्यावरील मारहाणीचा संदर्भ दिला जातो. मात्र, हा आदेश देताना उपसभापतींना तसा अधिकार होता का, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. जर तो अधिकारच नव्हता, तर त्या आदेशाची कायदेशीर वैधता संशयास्पद ठरते.

यानंतर अधिकच गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली, विधान परिषद सभापती (भाजपचे) राम शिंदे यांनी कोणताही औपचारिक अर्ज किंवा अपील न करता हे निलंबन रद्द करण्याचा निर्णय घेतला. येथेही प्रश्न तोच जर मूळ निलंबन आदेशच अधिकाराबाहेरचा असेल, तर त्यावर पुनर्विचार करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार कोणाला आणि कसा प्राप्त होतो ?

संसदीय लोकशाहीत प्रत्येक निर्णय हा ठरावीक नियम आणि प्रक्रियेनुसार घेतला जाणे अपेक्षित असते. निलंबनासारखा गंभीर निर्णय घेताना नियमावली, सभागृहाचे अधिकार आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचा विचार होणे अत्यावश्यक असते. तसेच, अशा निर्णयाविरोधात अपील किंवा न्यायालयीन दाद मागण्याची स्पष्ट प्रक्रिया असते. मात्र या प्रकरणात ती प्रक्रिया वळसा घालून थेट निर्णय बदलण्यात आल्याचे दिसते.

या संपूर्ण घडामोडींमध्ये राजकीय हस्तक्षेपाचा आरोपही होत आहे. एका पक्षाच्या नेत्याने घेतलेला निर्णय आणि त्यानंतर दुसऱ्या टप्प्यावर दुसऱ्या पक्षाच्या व्यक्तीकडून तो बदलला जाणे, यामुळे निर्णय प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. विधिमंडळ हे राजकीय मतभेद मांडण्याचे व्यासपीठ असले, तरी त्याच्या कार्यपद्धतीत नियमबद्धता आणि तटस्थता अत्यावश्यक असते. याहूनही चिंताजनक बाब म्हणजे, अशा वादग्रस्त निर्णयांमुळे संपूर्ण विधान परिषदेच्या प्रतिमेला धक्का बसतो. वरिष्ठ सभागृह म्हणून विधान परिषदेला धोरणात्मक चर्चा, कायद्यांचे सूक्ष्म परीक्षण आणि संतुलित विचार यासाठी ओळखले जाते. मात्र अशा घटनांमुळे तेच सभागृह राजकीय 'नाट्यगृह' बनल्याची टीका होऊ लागते.

या प्रकरणात योग्य मार्ग कोणता होता? जर निलंबन आदेश बेकायदेशीर वाटत असेल, तर संबंधित पक्षाने उच्च न्यायालयात दाद मागणे अपेक्षित होते. त्याद्वारे न्यायालयीन परीक्षण होऊन स्पष्टता आली असती. मात्र तसे न होता, सभागृहातच निर्णय बदलल्याने प्रक्रियात्मक शंका अधिक गडद झाल्या आहेत.

लोकशाही व्यवस्थेचा पाया हा नियम, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांवर उभा असतो. कोणताही निर्णय घेताना किंवा बदलताना या तत्वांचा भंग होत असेल, तर तो केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करतो.

आज गरज आहे ती या प्रकरणाचा वस्तुनिष्ठ आणि कायदेशीर पुनर्विचार करण्याची. सभागृहाच्या अधिकारांचे स्पष्ट सीमांकन, नियमांचे काटेकोर पालन आणि राजकीय हस्तक्षेपापासून निर्णय प्रक्रियेचे संरक्षण हेच या वादातून घेतले पाहिजेले धडे आहेत. अन्यथा, विधान परिषद ही 'विचारमंथनाचे सभागृह' न राहता 'सत्तेच्या सोयीचे साधन' बनण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# अशोक खरात या नराधमाला फाशीची शिक्षा व मदत करणाऱ्या दिग्गजांना कठोर शिक्षा होईल का?

महाराष्ट्राच्या इतिहासातील अशोक खरात या नालायक नराधमाने विकृतीची हद पार करून भयावह कृत्य केले आहे ज्याची कल्पना करणे कठीण आहे आणि ही आता महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स झाली आहे.त्यामुळे ही संपूर्ण चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून व्हायला पाहिजे.असे वाटते की भोंदूबाबा अशोक खरात त्यांना मदत करणारे राजकीय पुढारी यांनी आतापर्यंत डोळ्यांवर पट्टी का बांधली होती ?खरात सोबत दिर्घकाळ चर्चा करणारे राजकीय पुढारी यांना खरातच्या कुकृत्याची खबर कशी काय लागली नाही ? त्याच्या जवळ व त्यांच्या सहकाऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आली कोठून ?खरातला खतपाणी कोण घालायचे ? असे अनेक प्रश्न आज सर्वसामाण्यांच्या मनात भेडसावत आहे.आज आपण मिडियाच्या माध्यमातून पहातो की नालायक अशोक खरात सोबत अनेक दिग्गज नेत्यांचे फोटो आहेत.याचाच अर्थ असा की,या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांचा अशोक खरात सोबत कुठेतरी काहीतरी अवश्य संबंध असायलाच पाहिजे.रुपाली चाकणकर ह्या महिला आयोगाच्या जबाबदार अध्यक्षा होत्या.महिला आयोगाचे पद महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अत्याचाराच्या दृष्टीकोनातून निराकरण करण्यासाठी निर्णय देणारे उच्च पद आहे जेणेकरून पिडित महिलांना योग्य न्याय मिळावा व समाजात सर्व काही सुरळीत रहावे.परंतु रूपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय देण्याचे सोडून अशोक खरात सारख्या भोंदू बाबाच्या नांदी लागुन व त्यांचे पाय धुवून अनेक महिलांचे वाटोळे केले. रूपाली चाकणकरांचे काम झाले की,लोका सांगे ब्रह्मज्ञान व स्वतः कोरडे पाषाण. आपण पहातो की मिडियाच्या माध्यमातून अशोक खरात याचे १०० हुन अधिक अश्लील व्हिडिओ सामोर आले आहेत यावरून आपण समजू शकतो की खरात यांची विकृती किती शिगेला पोहोचली होती आणि खालच्या स्तरावर जावून ठेपली होती आणि अशा नराधमाचे पाय सुरक्षित माजी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर धुतात आणि राजकीय पुढारी त्यांच्या पायापडतात ही कीती शरमेची आणि लाजिरवाणी बाब आहे.मी तर म्हणेल की, ज्या–ज्या राजकीय पुढाऱ्यांचे घनिष्ठ संबंध होते अशा सर्वांनाच सरकारने सह आरोपी बनवायला पाहिजे .कारण खरातनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला कलंकित केले आहे.त्याचप्रमाणे अशोक खरात सोबत ज्या –ज्या दिग्गज नेत्यांचे फोटो किंवा बैठका झाल्या आहेत त्यांचीही चौकशी होणे गरजेचे आहे.कारण अशोक खरात विकृत होताच परंतु सेक्स रॅकेट चालवायचा का ? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे एखाद्या गुन्हेगारासोबत सर्वसामान्य व्यक्तीचा फोटो असतो अशा परिस्थितीत पोलीस विभाग सर्वसामान्य व्यक्तीची कसून चौकशी करीत असतो वेळ पडल्यास तुरूंगात सुद्धा टाकतो. अशाचप्रकारे अशोक खरात सोबत संबंध असणारे व त्यांच्या सोबत फोटोत असणारे या सर्वांचीच कसुन चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विकृतीची सिमा ओलांडणारा खरात यांच्या जवळ करोडोंची संपत्ती आली कोठून याची चौकशी करण्यासाठी त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी आवश्यक आहे.खरात हा राज्यासह देशाचा मोठा गुन्हेगार आहे, महिलांचा गुन्हेगार आहे,पिडीतांचा गुन्हेगार आहेत, सर्वसामान्यांचा गुन्हेगार आहे आणि अनेकांची संपत्ती हडपण्याचे काम खरात यानी केले आहे त्यामुळे त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे तेंव्हाच सत्य सामोर येईल.कारण खरातच्या या प्रकरणावरून असे लक्षात येते की,यात मोठमोठे मासे अडकु शकतात यालाही नाकारता येत नाही.आपण जेव्हा समान कायदा किंवा समान अधिकार म्हणतो तेव्हा खरातच्या केसमध्ये सर्वांनीच खुलुन सुरक्षा विभाग,पोलीस विभाग यांना सर्वतोपरी सहकार्य करने आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या–ज्या महिलांवर अत्याचार झाले आहेत किंवा खरातनी ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न केले आहे अशा सर्वांनी पोलीस यंत्रणेला मदत करून या संपूर्ण रॅकेटचा पदार्फाश केला पाहिजे जेणेकरून असे घृणास्पद कृत्य भविष्यात कोणीही करू शकणार नाही.भोंदू खरातने नरबळी व पशुबळी दिल्याचेही सांगितले जाते त्यामुळे खरात विकृत,नालायक आहेच सोबतच सर्वसामान्यांचा मोठा हत्यारा सुध्दा आहे. त्यामुळे त्याच्या सोबत असणाऱ्यांचा किंवा फोटोंमध्ये असणाऱ्यांची कसून चौकशी व्हायलाच पाहिजे तेव्हाच दुध का दुध पाणी का पाणी होईल. राजकीय पुढारी प्रथम खरातला भेटले तेव्हा चांगले बाबा होते आणि आता भोंदूबाबा म्हणतात याची लाज व शरम खरातला भेटणाऱ्या राजकीय पुढारी व सेलिब्रिटीला वाटायला पाहिजे.यावरून स्पष्ट होते की, राजकीय पुढारी स्वतःच्या स्वाथार्साठी आणि अस्तित्वासाठी भोंदूबाबांना सुध्दा जवळ करतात.खरातने शेतकऱ्यांची जमीन लुबाडली धरणाचे पाणी आपल्या शेतात वळवते केले तेव्हा राजकीय पुढारी खरातच्या पायाशी लोळत होते आणि आता भोंदूबाबा म्हणून पळ काढण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी करीत आहे ही बाब सामान्य माणूस व कायदा कदापि सहन करणार नाही.जोपर्यंत भोंदूबाबा प्रकरणात राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा चौकशी होत नाही तोपर्यंत समाजाला व सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळणार नाही.खरातचे आता जेवढे काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत ते फक्त ५० टक्के असावेत यापुढे आणखी मोठा उलघडा होऊ शकतो.कारण खरात राजकीय पुढाऱ्यांच्या मदतीने सेक्स कैन्डलसह अनेक कारनामे करीत असावेत अशीही शंका निर्माण होत आहे,याचाही खुलासा व्हायला हवा.राज्याची सुरक्षा यंत्रणा,पोलीस यंत्रणा व एसआयटी सह स्थानिक पोलिस यंत्रणा अत्यंत शिताफीने कार्य करीत आहेत आणि त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे.अशा परिस्थितीत सरकारने, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांनी सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी सहकार्य केले पाहिजे.ज्या–ज्या राजकीय पुढाऱ्यांचे खरात सोबत चर्चा करतांनाचे फोटो आहेत त्यांना सुध्दा सह आरोपी बनवून कारवाई केली पाहिजे.खरातला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनीच केले आहे त्यामुळे खरातने आपल्या घृणास्पद कृत्यावर पकठ मजबूत ठेवली होती आणि आज उघडकीस आले तर सर्वच राजकीय पुढारी खरातच्या केसपासुन भोंदूबाबा म्हणून हात झाडण्याचे काम करीत आहेत हे राज्याचे दुर्भाग्य आहे.मी सरकारला विनंती करतो की महाराष्ट्राला खरातच्या कलंकापासुन वाचविण्यासाठी अशोक खरातची फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून संपूर्ण उलघडे करावेत व लवकरात लवकर अशोक खरातच्या गळ्यात फाशीचा दोर पडावा सोबतच खरात सोबत संबंध ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## करमाळा पोलिसांची दमदार कारवाई
# ९.३५ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त

**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** करमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा पर्दाफाश करत पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. मोटारसायकलवरून येत फिर्यादीकडील सोन्याचे दागिने हिसकावून पळालेल्या आरोपीस पोलिसांनी अटक करत सुमारे ९ लाख ३५ हजार ८२८ रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १२ मार्च २०२६ रोजी फिर्यादी मीना माणिक मेंढे (रा. शेलगाव, ता. पंढरपूर) या करमाळा येथे आल्या असताना सायंकाळच्या सुमारास महादेव मंदिराजवळ दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून येत त्यांच्या गळ्यातील सुमारे ९०.६८० ग्रॅम वजनाची सोन्याची गंठण जबरदस्तीने हिसकावून



नेली. या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रंजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढला. तपासादरम्यान आरोपी लक्ष्मण उर्फ फिरोज अजित शेख (रा. नेवासा, जि. अहमदनगर) यास अटक करण्यात आली. आरोपीकडून चोरीस गेलेले सुमारे ९०.६८० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत अंदाजे ९,३५,८२८ रुपये) हस्तगत करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. आरोपीवर यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यादव, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना तडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या यशस्वी कारवाईमुळे करमाळा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# डिजिटल अरेस्टची भीती दाखवून 21 लाखांची फसवणूक; आरोपी जेरबंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पोलिस असल्याची बतावणी करून 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत सोलापुरातील एका वृद्धाची 21 लाख 25 हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दिल्लीतील सायबर गुन्हेगारास सोलापूर शहर सायबर पोलिसांनी अटक केली आहे. राघवेंद्रसिंग पिता मुलचंद (वय 38, रा. हायटेंशन रोड, कपासहेडा, नवी दिल्ली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून गुन्ह्यातील सुमारे साडेनऊ लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे.

या प्रकरणात आरोपीने स्वतःला कुलाबा पोलिस ठाण्यातील सब–इन्स्पेक्टर असल्याचे भासवून संबंधित वृद्धाला मनी लॉन्डरिंगच्या गुन्ह्यात अडकवल्याची खोटी माहिती




दिली. त्यानंतर 'डिजिटल अरेस्ट' ची भीती दाखवत त्याच्याकडून टप्प्याटप्प्याने 21 लाख 25 हजार रुपये ट्रान्स्फर करून घेतले.

फसवणूक झाल्याची तक्रार प्राप्त होताच सोलापूर सायबर पोलिसांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर तज्ज्ञ पथकाने दिल्लीत धडक कारवाई करत 17 मार्च रोजी आरोपीला अटक केली. चौकशीत आरोपीने साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा, पोलीस उपनिरीक्षक नागेश इंगळे, प्रवीण भोपळे, गंगावणे, कृष्णात जाधव, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, रतिकांत राजमाने यांनी सहभाग घेतला.

**सावधगिरीचे आवाहन**

डिजिटल अरेस्टचा संशय आल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, अनोळखी व्हिडिओ कॉल स्वीकारू नयेत तसेच मोबाईलमधील आर्थिक व्यवहाराशी संबंधित ॲप्सचे पिन, पासवर्ड कोणालाही देऊ नयेत, असे आवाहन वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी केले आहे.

पान १ वरून

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल...

दोन्ही अहवालाची पडताळणी करून आवश्यक त्या गॅस एजन्सीला पोलीस संरक्षण देण्याबाबतची कार्यवाही केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व गॅस कंपन्यांनी त्यांना वरिष्ठ स्तरावरून सोलापूर जिल्ह्यासाठी दैनंदिन किती प्रमाणात गॅस पुरवठा केला जात आहे तसेच त्याचे वितरण कशा पद्धतीने होत आहे याची माहिती दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत पुरवठा विभागाला सादर करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. प्रशासन व सर्व गॅस कंपन्या यांच्यामध्ये समन्वय व संवाद असला पाहिजे. त्यामुळे नागरिकांना विहित पद्धतीने व वेळेत गॅस पुरवठा उपलब्ध करण्यात अडचण निर्माण होणार नाही असेही त्यांनी सांगितले.

**जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजी चा तुटवडा नाही:–**

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये नागरिकांकडून पेट्रोल व डिझेलच्या घाईघाईने खरेदीमुळे पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागत असल्याचे राज्य प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. मात्र, राज्यात पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात ही पेट्रोल, डिझेल व घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व घाईघाईने खरेदी करण्याची गरज नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

# रस्ते अपघातग्रस्तांसाठी जीवनदायी असलेली 'पीएम-राहत' योजना प्रभावीपणे राबवा - सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड (१.५०) लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क उपलब्ध करून देण्याऱ्या 'पीएम–राहत' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य हमी सोसायटीची भूमिका महत्वाची आहे. रूग्णाला ह्यगोल्डन अवरह्लमध्ये तातडीचे उपचार देवून मृत्यूदर कमी करण्यास कटिबद्ध रहावे असे आवाहन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात आयोजित जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले. केंद्र शासनाच्या सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी 'प्रधानमंत्री – रस्ता अपघातग्रस्त रुग्णालयीन उपचार आणि हमी उपचार (पीएम झ्र राहत) योजना' आणली आहे. या योजने अंतर्गत 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' व 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने 7 दिवसांपर्यंत दीड (1.50) लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क (रोखरहित) देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. 'पीएम–राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. पीएम –राहत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य



आरोग्य सोसायटीच्या प्रशासनाची भुमिका महत्वाची असुन, रूग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी अंगीकृत रुग्णालयात दाखल करणे. पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे, PM-RAHAT योजनेअंतर्गत उपचारास मंजूरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात (पीएम –राहत ) योजना राबवण्यासाठी परिवहन विभागाच्या अखत्यारीतील 'राज्य रस्ते सुरक्षा परिषद' ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली असुन, योजनेची अंतिम देयके परिवहन विभागामार्फत दिली जातात. रस्ते अपघातानंतर 24 तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघातग्रस्त भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही 'पीएम राहत' योजनेचा लाभ मिळणार आहे. उपचार खर्च अपघाताच्या तारखेपासून कमाल 7 दिवसांपर्यंत समाविष्ट (आवृत) केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत नियुक्त (निर्दिष्ट) व अनियुक्त (अनिर्दिष्ट) रुग्णालयांमध्येही उपचार करता येणार आहेत. पीएमजेएवाय, एमजेपीजेएवाय व पीएम राहत योजनेत सामाविष्ट अंगीकृत रुग्णालये ही नियुक्त (निर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या व्यतिरिक्त सर्व रुग्णालये अनियुक्त (अनिर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या सर्व रुग्णालयांत अपघातग्रस्त रुग्णास स्थिरीकरण उपचार देणे अपेक्षित आहे. स्थिरीकरण उपचारानंतर रुग्णास पुढील उपचारांसाठी नियुक्त (निर्दिष्ट) अंगीकृत रुग्णालयात हलविणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी 112 या आपत्कालीन प्रतिसाद सहाय्य प्रणाली क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच या योजनेची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले आहे. या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, नागरी आरोग्य अभियान आयुक्त सुनील भोकरे, जन आरोग्य योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, आरोग्य विभागाच्या सह संचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## वात्रटिका
### धन्य तो नर हरी

धन्य तो नर हरी देवा
पसरवली ज्याने हिरवळ...
चोहीकडे झाला गलगा
आणि एकचि कल्लोळ...
बुवा तिथे बाई हे काही
झाकून राहात नाही...
हेही नको नि तेही नको
नेता मधल्या मार्गाने जाई...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# डबल मर्डर प्रकरणी उच्च न्यायालयात जामीन मंजूर - ॲड. जयदीप माने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** गुंजेगाव, ता. मंगळवेढा येथे दि. ११/०३/२०२५ रोजी रिना आप्पासाहेब ढोबळे आणि चंद्रकांत तात्यासाहेब पाटील या दोघांचा पूर्ववैमनस्यावरुन लोखंडी कोयता, हातोडा व पाईपने मारुन खुन केल्याच्या आरोपावरुन अटकेत असलेला आरोपी गणेश लक्ष्मण ढोबळे रा. गुंजेगाव ता. मंगळवेढा याची मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच ने जामिनावर मुक्तता केली.

या प्रकरणाची हकीकत अशी की, मयत रिना ढोबळे हिचे पती पाच वर्षापुर्वी निधन पावले होते.

त्यानंतर ती चंद्रकांत तात्यासाहेब पाटील याच्यासोबत राहत होती. तिचे व शेजारील शेतकरी लक्ष्मण ढोबळे यांचे पाईपलाईनच्या चेंबरच्या कारणावरुन वाद होता.

याबाबत एकमेकांविरुध्द फिर्याद दाखल झाले होते. त्यामुळे आलेल्या वैमनस्यामुळे



लक्ष्मण ढोबळे , गणेश ढोबळे यांचेसह सातजणांनी रिना व चंद्रकांतचा दि.११/०३/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वाजता खुन केल्याच्या आरोपावरुन मंगळवेढा पोलिसांनी दोषारोप पत्रक पाठवले होते.

आरोपी गणेश ढोबळे याचा जामिन अर्ज पंढरपूर सेशन्स कोर्टानी फेटाळून लावला होता.

त्यानंतर आरोपी गणेश ढोबळे यांचेतर्फे ॲड. जयदीप माने यांनी मुंबई उच्च न्यायालय कोल्हापुर सर्किट बेंच मध्ये जामीन अर्ज दाखल केला होता.

सुनावणी दरम्यान आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आरोपी गणेश ढोबळे याच्या सहभागाबद्दलच्या साक्षीदारांच्या विसंगती न्यायालयाच्या निर्दर्शनास आणुन दिल्या.

या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. एन. बी. पाटील यांनी काम पाहिले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रयत शिक्षण संस्थेतील शिक्षण म्हणजे संस्कार व गुणवत्तेचा ब्रँड- तुकाराम पाटील



**माढा (कटूसत्य वृत्त):-** कर्मवीर भाऊराव पाटलांनी ग्रामीण भागातील गोरगरीब,गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना सहजासहजी शिक्षण मिळावे. या उद्देशाने सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या शेकडों शाखा राज्यात कार्यरत आहेत.त्या ठिकाणी कार्यरत उच्चशिक्षित, अनुभवी व तंत्रस्नेही शिक्षक अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने कृतियुक्त अध्यापनाचे काम करीत आहेत.ते ज्ञानी, संस्कारक्षम व सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याचे काम करताहेत.रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेला विद्यार्थी स्पर्धेच्या युगात कोठेही मागे पडत नाही.या संस्थेच्या विविध शाखांमधील शेकडों विद्यार्थी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत मोठे अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत त्यामुळे रयत शिक्षण संस्था म्हणजे संस्कार व गुणवत्तेचा ब्रँडच असल्याचे गौरवोद्गार बार्शी तालुक्यातील उंडेगावचे स्कूल कमिटीचे मार्गदर्शक तुकाराम पाटील यांनी काढले आहेत.

ते उपळाई बुद्रुक ता.माढा येथे रयत शिक्षण संस्थेतून 32 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त होत असलेले वरिष्ठ लेखनिक नागनाथ गजेंद्र बरबडे यांचा सपत्नीक सत्कार करताना अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक हनुमंत राऊत यांनी केले. सेवानिवृत्तीनिमित्त नागनाथ बरबडे व त्यांच्या पत्नी शोभा बरबडे यांचा सत्कार अध्यक्ष तुकाराम पाटील, मुख्याध्यापक हनुमंत राऊत, सहशिक्षिका सुनिता बिडवे, मित्रमंडळी व नातेवाईक यांच्या हस्ते करण्यात आला.रयत को-ऑपरेटिव्ह बँक सातारा यांच्या वतीने बरबडे यांना चांदीचे मेडल व शाल देऊन गौरविण्यात आले. यावेळी माजी सरपंच मनोहर गायकवाड यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे व अचूकपणे काम केल्याबद्दल नागनाथ बरबडे यांचा स्कूल कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करणे आमचे कर्तव्य आहे.गुणी व्यक्तींचा सन्मान करणे म्हणजे एक प्रकारचे आत्मिक समाधान होय. सेवाकाळात ज्यांनी चांगले काम केले आहे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे गरजेचे आहे जेणेकरून इतर शिक्षक व कर्मचारी त्यापासून प्रेरणा घेतील असे त्यांनी सांगितले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य विजयकुमार डुरे-पाटील यांनी सांगितले की,नागनाथ बरबडे यांनी वैयक्तिक व कौटुंबिक कामापेक्षा संस्थेच्या व शैक्षणिक कामाला प्राधान्य दिले.त्यांच्या अथक प्रयत्नातूनच उंडेगाव येथे न्यू इंग्लिश स्कूलची 1 कोटी खर्चातून सुसज्ज व अद्ययावत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. संस्थेचे अत्यंत कडक नियम व शिस्त असताना एकाच शाखेमध्ये सलग 30 वर्षे अविरतपणे काम करण्याची अनोखी किमया नागनाथ बरबडे यांनी केली आहे. ही बाब निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना नागनाथ बरबडे यांनी सांगितले की, रयत शिक्षण संस्थेत मी माझी 32 वर्षे सेवा प्रामाणिकपणे पूर्ण केली याचा मला सार्थ अभिमान आहे. या कालावधीत मला अनेक मुख्याध्यापक,शिक्षक, नातेवाईक व मित्रमंडळी आणि माझ्या कुटुंबातील सदस्यांनी लाख मोलाची साथ दिली आहे.

सूत्रसंचालन सहशिक्षक अनिल डोईफोडे यांनी केले. आभार योगेश धस यांनी मानले.

यावेळी माढेश्वरी बँकेचे संचालक ॲड.नानासाहेब शेंडे, मुख्याध्यापक विजयकुमार डुरे, मनोहर गायकवाड, माजी प्राचार्य दिलीप पाटील, चेअरमन नंदकिशोर गायकवाड, प्राचार्य औदुंबर गायकवाड, सेवानिवृत्त पीएसआय हनुमंत उबाळे, आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड, रामलिंग बरबडे, शरद मोहिते, धनाजी बरडे, सुधीर गुंड, श्रीधर बरडे, शोभा बरबडे, माधुरी गुंड, वैष्णवी बरडे, सौरभ बरबडे, अंकुश घोडके, बप्पासाहेब यादव, मुकुंद गायकवाड, बाबासाहेब पठाण माने आर.डी,सुरेखा एनकीकर, महादेवी लंकेश्वर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकीमध्ये विझोटेक २०२६ राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संशोधन हे अभियांत्रिकी शिक्षणाचे केंद्रबिंदू मानले जात असून विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी व्ही.व्ही.पी.

अभियांत्रिकी महाविद्यालय व व्ही.व्ही. पी. तंत्रनिकेतन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विझोटेक २०२६' या राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अमोल चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना मिळणार असून नवकल्पनांना प्रोत्साहन मिळणार आहे. दि. २८ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते होणार असून महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांतील विद्यार्थ्यांना विविध प्रकल्प सादर करण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेत विविध उपक्रमांसह संशोधन निबंध सादरीकरणाचाही समावेश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि संशोधन क्षमतेला नवी दिशा मिळेल, असा प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड व प्राचार्य डॉ. सुनीलदत्त कुलकर्णी यांनी या स्पर्धेसाठी कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू आणि महाराष्ट्र राज्यांमधून मोठा प्रतिसाद मिळत असून विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. स्नेहल मांजरे, प्रा. अनिल अवदूत यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी परिश्रम घेत आहेत.

या पत्रकार परिषदेस प्रा. स्नेहल मांजरे, प्रा. अनिल अवदूत, प्रा. आर. वाय. बिराजदार आदी उपस्थित होते.

# अक्कलकोटच्या श्रीराम मंदीरात श्रीराम नवमी उत्सव संपन्न



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री राम जन्मले गं बाई.... श्री राम...! श्रीक्षेत्र अयोध्या निवासी श्री राम की जय...! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गुरुवारी श्रीं राम नवमी निमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक कार्यक्रमासह सण, वार, उत्सव, सोहळा साजरा करण्यात येतो, गुरुवारी श्रीं राम नवमी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दरम्यान न्यासाच्या विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाने महाप्रसाद गृहात श्री राम नवमी निमित्त पाळणा कार्यक्रम गुरुवारी दुपारी १२ वा. संपन्न झाला.

या प्रसंगी सुवर्णा घाडगे, रूपा पवार, तृप्ती बाबर, निशा बाबर, कविता भोसले, कविता वाकडे, छाया पवार, वैभवी पवार, अनिता गडदे यांच्या व स्वामी भक्तांच्या उपस्थितीत पाळणा कार्यक्रम संपन्न झाला. पाळणा गीताबरोबरच पुरोहित विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते विधिवत पूजा, धार्मिक कार्यक्रम भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, मनोज निकम, निखील पाटील, अतिश पवार, गोटू माने, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, संभाजीराव पवार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, रोहित मोरे, मैनुद्दीन कोरबू, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त बालाजी अमाईन्सकडून साहित्य वितरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ निमित्त बालाजी अमाईन्स लि यांच्या वतीने महामार्ग पोलीस मदत केन्द्र पाकणी येथे विविध सुरक्षा साहित्याचे वितरण करण्यात आले.या उपक्रमांतर्गत हेल्मेट, रिफलेक्टर जॅकेट, प्रथमोचार पेटी, या साहित्याचे वितरण करण्यात आले महामार्गावर प्रवास करणा-या दुचाकी स्वारांच्या सुरेक्षेसाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यकमाचे आयोजन रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले होते या वेळी कंपनीचे जनरल मॅनेजर गोविंद मेंचेकरे यांच्या हस्ते पाकणी महामार्ग पोलिस मदत केन्द्राचे प्रभारी अधिकारी आनंद थिटे यांना हेल्मेट रिफलेक्टर जॅकेट ,प्रथमोपचार पेटी, यांचे कडे सुपूर्त करण्यात आले. या कार्यकमास बालाजी अमाईन्स चे सीएसआर प्रमुख अनिल विपत तसेच दत्तप्रसाद सांजेकर, आदित्य जैन, अमोल गुंड, बसवराज अंटद, हे उपस्थित होते. बालाजी अमाईन्सच्या वतीने हेल्मेट रिफ्लेक्टर जॅकेट तसेच प्रथमोपचार पेटी या वस्तू महामार्ग पोलिस मदत केन्द्र पाकणी यांना दिल्यामुळे केन्द्रास मदत झाली या बददल आनंद थिटे यांनी यांनी बालाजी अमाईन्स लि कंपनी चे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी व संचालक मंडळाचे आभार मानले.


# अन्यथा तुमची लव जिहादला मुक संमती आहे - डॉ. धवलसिंह



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आज पर्यंत भारत देशात, प्रत्येक समाजाला बरोबर घेऊन, देशाच्या उन्नतीसाठी काम करायची ही हिंदू धर्माची, पूर्वजांची शिकवण व संस्कृती राहिली आहे.अलीकडील काळामध्ये लव जिहादच्या माध्यमातून हिंदू धर्माच्या मुलींना दिशाहीन करून,भ्रमित करून,त्यांचे शोषण करण्याचे प्रस्त सुरू आहे. यामध्ये मुस्लिम समाजाच्या युवकांचा जाणीवपूर्वक सहभाग वाढत चालला असल्याचे दिसून येत आहे असे मत पत्रकारांशी बोलताना डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

पुढे बोलताना डॉ. धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले की, माळशिरस तालुक्यात पहिल्यांदा हा प्रकार पाहायला मिळाला. मुलगी मुलीचे कुटुंब धाडसाने पुढे आले, त्यांची फसवणूक झाली होती म्हणून आम्ही त्यांच्या पाठीशी एक भाऊ म्हणून गेलो होतो. लव जिहाद सारखी मानसिकतेला आम्ही ठेचून काढण्याचं काम यापुढे करणार आहे. हे प्रेम नाही, जाणीवपूर्वक, हेतू पुरस्कृत केलेले कृत्य आहे असे म्हणत, पुढे डॉ. मोहिते पाटील म्हणाले शेख या मुलाचे खोटे आधार कार्ड, खोटे पॅन कार्ड ज्याने बनवले, त्या टोळीचा शोध घेतला पाहिजे, त्यांची सखोल चौकशी झाली पाहिजे, त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण पुढे भविष्यात शासकीय कागदांची छेडछाड करण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही पाहिजे. माझं मुस्लिम समाजाच्या लोकांना आवाहन आहे, अशी फसवणूक करणारे युवक त्याच्या विरोधात मुस्लिम समाजाने रस्त्यावर उतरले पाहिजे, तुमची भूमिका स्पष्ट केली पाहिजे, जर तुमचा लव जिहादला पाठिंबा नसेल तर ?अन्यथा तुमची मूकसंमती आहे असा समज हिंदू मुलांच्या मनामध्ये आल्याशिवाय राहणार नाही. हा समज होऊ द्यायचा नसेल तर मुस्लिम समाजाने लव जिहादला विरोध केला पाहिजे, भविष्यामध्ये लव जिहादला पाठिंबा देणाऱ्यांच्या विरोधामध्ये आम्ही कडक भूमिका घेऊ असेही डॉ. धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले.

# मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार




**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून महाराष्ट्रासाठी ही मोठी हानी आहे. मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराराणी, छत्रपती राजाराम महाराज, संताजी-धनाजी, राजर्षी शाहू महाराज, रामचंद्र पंत अमात्य ते क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा सखोल अभ्यास करून डॉ. जयसिंगराव पवार यांनी वस्तुनिष्ठ आणि दस्तऐवजांवर आधारित इतिहास लेखन केले. मराठेशाहीतील इतिहासावरील गैरसमज दूर करून वास्तववादी इतिहास समाजासमोर मांडण्याचे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे.

त्यांच्या निधनामुळे इतिहास संशोधन क्षेत्रातील एक प्रामाणिक, अभ्यासू आणि तपस्वी व्यक्तिमत्त्व आपण गमावले असून, त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी, विद्यार्थ्यांसाठी सदैव मार्गदर्शक राहील, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# जेष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना सिम्बायोसिसकडून 'डी.लिट' मानद पदवी प्रदान



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक जीवन आणि प्रशासकीय क्षेत्रातील प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाबद्दल देशाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांना सिम्बायोसिस इंटरनॅशनल (डीम्ड युनिव्हर्सिटी) तर्फे प्रतिष्ठित 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (डी.लिट) ही मानद पदवी प्रदान करून गौरवण्यात आले.

विद्यापीठाच्या लवळे येथील कॅम्पसमध्ये आयोजित विशेष दीक्षांत समारंभात हा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

प्रख्यात शास्त्रज्ञ, फेलो ऑफ रॉयल सोसायटी (FRS) आणि 'कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च' (CSIR) चे माजी महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शिंदे यांना ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे संस्थापक-कुलपती प्रो. डॉ. एस.बी. मुजुमदार होते.

जेष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत विविध पदे भूषवली असून, त्यांचे प्रशासकीय कौशल्य आणि समाजहितासाठी केलेले कार्य आदर्शवत आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली. अशा महान व्यक्तीला सन्मानित करणे हा सिम्बायोसिससाठी देखील एक मोठा बहुमान असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

या विशेष दीक्षांत समारंभाला सिम्बायोसिसच्या प्रो-चांसलर डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू (व्हाईस चांसलर) डॉ. रामकृष्णन रमण यांच्यासह विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे आणि शैक्षणिक परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

समाजासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्वांना सन्मानित करण्याची सिम्बायोसिसची परंपरा या सोहळ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली. या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून सुशीलकुमार शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 211

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | | | | | 5 | 1 |
| | | 7 | | | 3 | | 6 | 9 |
| | 6 | | 5 | | 4 | | | |
| | 3 | 8 | 4 | 5 | 1 | | | |
| 2 | | | | | 6 | 8 | | 5 |
| 6 | | | | | 2 | 7 | | |
| 3 | 8 | | 1 | 7 | 5 | | | |
| 4 | | | 3 | 6 | 9 | 1 | | 8 |
| | 1 | | | | | 5 | 7 | |

# सोलापूर ऊर्जा प्रकल्प ठाम ६,६०० मिलियन युनिटचे उद्दिष्ट कायम



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पातळीवरील तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीचा सोलापूर औष्णिक ऊर्जा प्रकल्पाच्या वीज निर्मितीवर कोणताही परिणाम झालेला नसल्याचा निर्वाळा प्रकल्पाचे मुख्य व्यवस्थापक एम. के. बेबी यांनी दिला. चालू वर्षअखेरपर्यंत ६,६००

मिलियन युनिट वीज निर्मितीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये (फेब्रुवारी अखेरपर्यंत) प्रकल्पाने ५६.४४ टक्के प्लांट लोड फॅक्टर (PLF) सह ५,९७१ मिलियन युनिट वीज निर्मिती केली आहे. आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत ही निर्मिती सुमारे ६,६०० मिलियन युनिटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

कोळसा पुरवठ्याबाबतही प्रकल्पाने चांगली कामगिरी केली असून, २०२३-२४ मधील ४७.०९ लाख मेट्रिक टन या विक्रमी प्राप्तीमध्ये सुधारणा झाली आहे. चालू वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत ४६.७२ लाख मेट्रिक टन कोळसा मिळाला असून, वर्षअखेरपर्यंत ५० लाख मेट्रिक टनपेक्षा अधिक कोळसा प्राप्त होण्याची शक्यता असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख बीजेसी शास्त्री यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२५ सप्टेंबर २०१७ पासून कार्यरत असलेला सोलापूर सुपर थर्मल पॉवर प्रकल्प हा एनटीपीसीच्या आधुनिक प्रकल्पांपैकी एक असून महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, गोवा तसेच दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव या राज्यांच्या वीज गरजा भागवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

औष्णिक वीज निर्मितीबरोबरच प्रकल्पाने नवीकरणीय ऊर्जेकडेही पाऊल टाकले असून २३ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

### नेट झिरोकडे वाटचाल

पर्यावरण संवर्धनासाठी प्रकल्पात झिरो लिक्विड डिस्चार्ज आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली राबविण्यात येत आहेत. ऊर्जा, पाणी आणि कचरा व्यवस्थापनात 'नेट झिरो' साध्य करण्याच्या दिशेने प्रकल्प प्रयत्नशील असून, १.८ मेगावॅट क्षमतेच्या सौर पीव्ही प्रकल्पाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.या पत्रकार परिषदेला सुभाषित बंदोपाध्याय, एचआर व्यवस्थापक कन्हैया दास आदी उपस्थित होते.

# दोन कोटी रुपये खर्चून बेलाटीत उभारणार राम मंदिर; भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथे राम मंदिराची उभारणी होणार आहे. जवळपास पंधरा हजार चौरस फूट जागेवर हे मंदिर उभे राहणार आहे. यासाठी जवळपास दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

श्री संत बाळूमामा ट्रस्टच्या वतीने हे मंदिर बांधण्यात येणार आहे. या निर्णयामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

काही दिवसांपूर्वी सोलापूर



विजापूर बायपास रोड लगत बेलाटी येथे श्रीराम मंदिराच्या पायाभूत चा शुभारंभ करण्यात आला आहे. बेलाटी येथील प्रसिद्ध असणाऱ्या श्री संत बाळूमामा मंदिराच्या परिसरातच हे राम मंदिर उभे केले जाणार आहे. या मंदिराच्या ट्रस्टचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार मंदिरासाठी जवळपास दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. ट्रस्टच्या वतीने मंदिराच्या उभारणीस सुरुवात केली जाणारा असून उर्वरित कामासाठी वर्गणीच्या माध्यमातून पैसे उभे केले जाणार आहे.

जवळपास १५ हजार चौरस फुटाच्या जागेवर हे मंदिर उभे केले जात आहे. मुख्य गाभारा हा आरसीसी पद्धतीच्या बांधकामात असून समोरील सभागृह हे गोलाकार पत्र्याच्या शेडमध्ये तयार केले जाणार आहे. तर प्रवेशद्वारावर मोठी आरसीसी कमाल उभी केली जाणार आहे. सद्यस्थितीला या बांधकामाच्या पायाचे काम सुरू झाले आहे. शक्य तितक्या लवकर या मंदिराचे काम पूर्ण करण्याचा निर्धार असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमासाठी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेकांनी आर्थिक व श्रमदानाच्या माध्यमातून सहभाग नोंदवण्याची तयारी दर्शविली आहे. मंदिर उभारणीसाठी लवकरच भूमिपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली. गावाच्या विकासात आणि धार्मिक वातावरण वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# सोलापुरात महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा; विजेत्याला कार, उपविजेत्याला बुलेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निर्झरा केअर फाऊंडेशनतर्फे सोलापुरात २८ व २९ मार्च रोजी चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या कुस्तीपटूला 'महाराष्ट्र केसरी' किताब, मानाची गदा आणि किया सोनेट कार देऊन गौरविण्यात येणार आहे. उपविजेत्याला बुलेट दुचाकी देण्यात येणार असून प्रत्येक गटातील सुवर्णपदक विजेत्याला ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहात झालेल्या वासा पूजन व माती पूजन सोहळ्यात अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते स्पर्धेच्या बक्षिसांचे अनावरण करण्यात आले. यावेळी त्यांनी ही स्पर्धा यशस्वी करून सोलापूरचा नावलौकिक वाढवण्याचे आवाहन केले. या स्पर्धेत ५० ते ७२ किलोपर्यंत विविध वजनी गट ठेवण्यात आले असून 'महाराष्ट्र केसरी' गट ६५ ते ७६ किलो असा असेल. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके देण्यात येणार आहेत.

ही प्रतिष्ठेची स्पर्धा सिद्धेश्वर पेठेतील हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर होणार असून राज्यातील ४२ जिल्ह्यांमधून ४०० हून अधिक महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. तीन वेळा किताब पटकावलेली भाग्यश्री फंड चौथ्यांदा विजेतेपदासाठी सज्ज असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उपक्रम

निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी आपल्या वडील ज्येष्ठ कुस्तीपटू सिद्धाराम साखरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या स्पर्धेचे आयोजन केले आहे. महिला कुस्तीपटूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास आमदार विजयकुमार देशमुख, महापौर विनायक कोंड्याल, रोहिणी तडवळकर, अस्लम काझी, भरत मेकाले यांच्यासह अनेक मान्यवर व कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरपोच गॅसच द्या; अन्यथा कारवाई - जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गॅस एजन्सींसमोर वाढत असलेली गर्दी आणि घरपोच वितरणात होणारा विलंब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कडक इशारा दिला आहे. गॅस सिलिंडर ग्राहकांच्या घरीच पोहोचवावेत, अन्यथा संबंधित एजन्सींवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात गॅस कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी एजन्सींना खडेबोल सुनावले. एजन्सीच्या गोदामासमोर सिलिंडर वाटप करणे टाळावे, तसेच अवैध विक्री आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी बजावले.

दरम्यान, 'उज्वला' योजनेतील ग्राहकांना तब्बल ४५ दिवसांनी गॅस मिळत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच, साडेचार दिवसांत घरपोच वितरणाचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात ८ ते १० दिवस उशीर होत असल्याचे



नागरिकांनी सांगितले.

### एजन्सीसमोरच वाटप; ग्राहकांमध्ये नाराजी

अनेक गॅस एजन्सींनी 'फक्त घरपोच सेवा' असे फलक लावले असतानाही प्रत्यक्षात एजन्सीच्या परिसरातच सिलिंडरचे वाटप सुरू असल्याचे दिसून आले. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण आहे. ई-केवायसीसाठीही एजन्सीबाहेर मोठ्या रांगा लागल्याचे चित्र आहे.

### १२-१३ दिवस प्रतीक्षा; ग्राहक त्रस्त

शहरातील काही भागांत सिलिंडर बुक केल्यानंतरही १२ ते १३ दिवसांनी गॅस मिळत आहे. घरपोच सेवा अपुरी पडत असल्याने अनेकांना स्वतः एजन्सीकडे जाऊन सिलिंडर घ्यावा लागत आहे. उन्हात तासनतास उभे राहावे लागत असल्याने महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### अफवांवर विश्वास नको

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्ट केले की, राज्यासह सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि घाईघाईने खरेदी करू नये.

या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, तसेच बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएलचे अधिकारी उपस्थित होते.

### ग्राहकांची मागणी

ग्राहकांच्या वाढत्या संख्येनुसार अधिक काउंटर सुरू करावेत, वेळेचे नियोजन करावे आणि गॅस वितरण सुरळीत करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्री सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालयात रामनवमी साजरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दि.26 राम या दोन अक्षरात जीवनाचे मांगल्य, पावित्र्य, शुचिर्भूतता आणि आचरण या संबंधाचे मर्म सामावले आहे. जो श्री रामाच्या तत्त्वज्ञानाचे आचरण करेल तो समाजहित जोपासून स्वतःबरोबर समाजाचे हित साधून देश कार्यात अग्रेसर राहील.असे संस्कार राम नामाच्या स्मरणात आहे.असे विवेचन संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार यांनी श्री सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालय आयोजित श्री रामनवमी कार्यक्रमात केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री. रामलिंगेश्वर प्रतिमेचे पूजन मान्यवरांकडून करण्यात आले.

या प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ.भीमाशंकर बिराजदार पुढे म्हणाले की,राम सा-या भारत वासीयांचे प्रेरणास्थान असून जीवन कसे जगावे याचा आदर्श आहे.राम जिथे आहे तिथे प्रेम आहे माया आहे इतरांची सुख दुःखद जाणण्याची कणव आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वैष्णवी बिराजदार यांनी केल. सूत्रसंचालन तन्वी पाटील यांनी केले.

कार्यक्रमास परिसरातील वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री रामाच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महिला दिनानिमित्त एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात रक्तदान शिबिर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय केगाव सोलापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. बुधवारी (२५ मार्च) आयोजित या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या हस्ते झाले.

या शिबिराला विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ५१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. शिबिराच्या निमित्ताने मुलींसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. तसेच संतुलित आहार, नियमित आरोग्य तपासणी आणि निरोगी जीवनशैली याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी ठरर कार्यक्रम अधिकारी प्रा. माणिक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठरर स्वयंसेवकांनी केली.

रक्तसंकलनासाठी डॉ. हेडगेवार ब्लड बँक, सोलापूर यांच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. डॉ. संगीता ओर व डॉ. वैद्य यांनी शिबिराचे वैद्यकीय समन्वय प्रभावीपणे पार पाडले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ठरर स्वयंसेवक तुषार खिल्लारे, समर्थ गायकवाड, कु. तन्वी जाधव आणि कु. ऋतुजा भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे रक्तदानाविषयी जनजागृती होण्याबरोबरच महिलांच्या आरोग्याविषयी संवेदनशीलता वाढण्यास मदत झाली. समाजाभिमुख मूल्यांची जपणूक करत महाविद्यालयाने सामाजिक दायित्वाची प्रभावी जाणीव करून दिली.

# तुटपुंज्या निवृत्तीवेतनामुळे ज्येष्ठांचे हाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** राज्यातील सुमारे ४७ लाख निवृत्तिधारकांना केवळ एक हजार रुपयांचे मासिक पेन्शन मिळत असल्याची बाब समोर आल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर या तुटपुंज्या रकमेवर गुजराण करणे अशक्य असल्याचे ज्येष्ठ नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे पेन्शनमध्ये तातडीने वाढ करून किमान जगण्यालायक रक्कम देण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

ज्येष्ठ नागरिक संघटना आणि निवृत्तिधारकांचे प्रतिनिधी यांचा आरोप आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून पेन्शन वाढीबाबत केवळ आश्वासने दिली जात आहेत; मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस अंमलबजावणी होत नाही. 'पेन्शन वाढणार' अशा बातम्या वारंवार येतात, पण बँक खात्यात वाढीव रक्कम जमा होत नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे ते सांगतात.

### महागाईसमोर पेन्शन ठरते अपुरी

दररोज वाढणाऱ्या अन्नधान्य, औषधे, वीज, घरभाडे आणि इतर आवश्यक खर्चाच्या तुलनेत एक हजार रुपयांची पेन्शन अत्यंत अपुरी ठरत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक खर्चासाठीच हजारो रुपये लागतात.



अशा परिस्थितीत मूलभूत गरजाही भागवणे कठीण होत असल्याचे वास्तव आहे.

'जगण्यालायक पेन्शन मिळत नसेल, तर आम्ही काय करावे?' असा थेट सवाल निवृत्तिधारकांकडून विचारला जात आहे. अनेकांनी आयुष्यभर सेवा करून निवृत्तीनंतर किमान आर्थिक सुरक्षितता मिळेल, अशी अपेक्षा ठेवली होती. मात्र सध्याची परिस्थिती त्यांच्या अपेक्षांना छेद देणारी ठरत आहे.

पेन्शन वाढीसाठी अनेकदा आंदोलने, निवेदने आणि बैठका झाल्या. काही ज्येष्ठ नागरिक या मागणीसाठी झटत असतानाच निधन पावल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. तरीदेखील शासन स्तरावर ठोस आणि अंतिम निर्णय होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

ज्येष्ठ नागरिक संघटनांनी लोकप्रतिनिधींवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आमदार, खासदार आणि मंत्र्यांना मोठ्या प्रमाणात वेतन, भत्ते आणि पेन्शन मिळत असताना, सामान्य निवृत्तिधारकांना केवळ हजार रुपये देणे हा अन्याय असल्याचा आरोप केला जात आहे. 'स्वतःसाठी भरघोस सुविधा आणि जनतेसाठी तुटपुंजे पेन्शन, हा दुहेरी मापदंड आहे,' अशी टीका करण्यात येत आहे.

ज्येष्ठ नागरिकांनी केवळ घोषणांवर विश्वास ठेवणे थांबवले असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीची मागणी केली आहे. 'बँक खात्यात वाढीव रक्कम जमा झाल्याशिवाय कोणत्याही घोषणेला अर्थ नाही,' असे स्पष्ट मत अनेकांनी व्यक्त केले. या वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन पेन्शनमध्ये वाढ करावी, अशी मागणी जोर धरत आहे. मात्र याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. त्यामुळे येत्या काळात सरकार कोणती भूमिका घेते, याकडे राज्यातील लाखो ज्येष्ठ नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पेन्शन हा केवळ आर्थिक विषय नसून, तो ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानाने जगण्याच्या हक्काशी संबंधित आहे. वाढत्या महागाईच्या काळात किमान जीवनमान राखण्यासाठी आवश्यक तेवढी पेन्शन देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त होत आहे. आता आश्वासनांपेक्षा कृतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# माळेगाव येथे दीपक केदार यांच्या उपस्थितीत शाखा उद्घाटन संपन्न



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील माळेगाव येथे 23 मार्च रोजी सामाजिक ऐक्याच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया पँथर सेना शाखा उद्घाटन करण्यात आली. सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

आपल्या दमदार भाषणात दीपक केदार यांनी अनुसूचित जाती-जमातींवर होणाऱ्या वाढत्या अन्याय आणि अत्याचाराला वाचा फोडली तसेच गायरान जमिनी तातडीने अनुसूचित जाती-जमातींना वाटप कराव्यात, अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा थेट इशारा त्यांनी शासनाला दिला.तसेच महिलांच्या शोषणाच्या प्रकरणात भोंदू खरात वरती कठोर कारवाई करण्याची मागणी करत प्रशासनाला धारेवर धरले.

यावेळी इक्वालिटी फाऊंडेशन संस्थापक महावीर वजाळे यांनी भाषणातून सांगितले की सामाजिक क्रांती टिकवण्यासाठी आर्थिक चळवळ उभी करणे अत्यावश्यक आहे.


युवकांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन उद्योग-व्यवसाय उभारावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास नागनाथ वाघमारे, बबन किर्ते, नाथा सावंत, सूर्यकांत लोंढे, महेंद्र सोनवणे, नवनाथ रेपे, पोपट लोंढे, सुदर्शन गायकवाड, शहाजी गायकवाड, नागेश मस्के यांसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

तसेच शाखा पदाधिकारी तुकाराम गायकवाड, हनुमंत लोंढे, क्रांतीदीप लोंढे, सत्वशील लोंढे, सचिन पवार, अमोल शिरतोडे, सिद्धार्थ लोंढे, विकास कांबळे, नवनाथ गाडे, संतोष कांबळे, बाळू लोंढे, निलेश कांबळे, मल्हार थोरात आदी उपस्थित होते.

माळेगावातील शाखा उद्घाटन कार्यक्रमातून सामाजिक न्याय, आर्थिक सक्षमीकरण आणि संघटन बळकटीकरणाचा ठाम संदेश देण्यात आला.

# श्रीकृष्ण गुरुकुलतर्फे शनिवारी विविध सांस्कृतिक कार्यक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कामती बुद्रुक येथील श्रीकृष्ण गुरुकुल शिक्षण संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रमोद आवताडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमात पानिपतकार तथा ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील,खा. डॉ. ज्योती वाघमारे, माजी आ. राजन पाटील, प्रगतशील शेतकरी रामराव भोसले-पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक जालिंदर लांडे, कविता अर्बन बँकेचे अध्यक्ष प्रकाश भोसले, डॉ. दीपक गायकवाड, सरपंच अंजली भोसले यांचा पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे आणि अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने वार्षिक स्नेहसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले असून राधा गुरुकुलच्या आवारात हा सोहळा पार पडणार आहे.

या कार्यक्रमास पालक, हितचिंतक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. प्रमोद आवताडे यांनी केले.

२०२१ साली वाघोलीवाडी येथील माळरानावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुरुकुल पद्धतीचे शिक्षण मिळावे या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली. या गुरुकुलने आज गुणवत्तापूर्ण शिक्षण, निवास व भोजनाच्या सोयीसह तालुक्यात उच्च निकालाची परंपरा निर्माण केली आहे. या यशाच्या बळावर संस्थेचा विस्तार होऊन कामती बुद्रुक येथे राधा गुरुकुल (मुलींसाठी निवासी संस्था) तसेच कामती खुर्द (लमाणतांडा) येथे एम.बी. चव्हाण गुरुकुल कार्यरत आहे.

या पत्रकार परिषदेस अर्जुन पाटील, हनुमंत निकम, आप्पासाहेब कोळी, दीपक माळी, राहुल क्षीरसागर, जयसिंग आवताडे, प्रा. ज्ञानेश्वर शिंदे, प्राचार्या कल्याणी कोळी व प्राचार्य किशोर शिनगारे आदी उपस्थित होते.

# गॅस टंचाई की व्यवस्थेचा गोंधळ? नागरिक त्रस्त, उत्तर मात्र 'अफवा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहरात सध्या घरगुती गॅस सिलिंडरच्या टंचाईची चर्चा जोरात आहे. शहरातील भारत गॅस एजन्सी सलग तीन दिवस बंद असल्याने ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सिलिंडर मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाकडून 'अफवांवर विश्वास ठेवू नका'असे आवाहन करण्यात येत आहे.

प्रशासनाचे म्हणणे योग्य असले तरी जमिनीवरील वास्तवही तितकेच महत्त्वाचे आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र सामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे एकच — त्यांच्या स्वयंपाकघरात वेळेवर गॅस सिलिंडर उपलब्ध होणे. एजन्सी बंद असल्याने अनेक कुटुंबांची गैरसोय झाली आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

तहसीलदार एफ. आर. शेख यांनी संयम राखण्याचे आणि अधिकृत माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी



कार्यालयामार्फत २४७७ आपत्कालीन कक्ष सुरू करण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. तक्रारींसाठी दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. ही सकारात्मक बाब असली तरी त्या यंत्रणेचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना कितपत मिळतो, याचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. दरम्यान, अनेक ग्राहकांनी गॅससाठी नंबर लावूनही अनेक दिवस उलटले तरी त्यांना सिलिंडर मिळालेला नाही. काही नागरिक एजन्सी कार्यालयात चौकशीसाठी गेले असता 'तुमची टाकी दुसऱ्या कोणाला तरी दिली गेली असेल', 'KYC केली आहे का?', 'तीन दिवसांनी या'अशा प्रकारची टोलवाटोलवीची उत्तरे मिळत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये अधिकच संभ्रम आणि नाराजी निर्माण होत आहे.

अशा वेळी प्रशासनाने केवळ आवाहन न करता पारदर्शक संवाद साधणे गरजेचे आहे. गॅस एजन्सी बंद का आहे? पुरवठा कधी सुरळीत होणार? पयायी व्यवस्था काय? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे नागरिकांना मिळाली तर अफवांना आपोआप आळा बसेल. माहितीच्या अभावातूनच अफवा जन्म घेतात.

नागरिकांनीही जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. गरजेपेक्षा जास्त साठा करणे, सोशल मीडियावर अप्रमाणित संदेश पुढे पाठवणे यामुळे परिस्थिती अधिक बिघडू शकते. संयम आणि सहकार्य हीच या तात्पुरत्या संकटातून बाहेर पडण्याची गुरुकिल्ली आहे.

आजची गरज आहे ती विश्वास निर्माण करण्याची. प्रशासनाने वेळेवर आणि स्पष्ट माहिती द्यावी, तर नागरिकांनी अधिकृत सूचनांचे पालन करावे. अफवा आणि वास्तव यामधील सीमारेषा स्पष्ट ठेवली तरच सोलापूर जिल्ह्यातील गॅस टंचाईचा प्रश्न लवकर मार्गी लागू शकेल.

# राज्यस्तरीय 'चाचा नेहरू बालमहोत्सव 2025-26' चे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य व सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव (सोलापूर) आणि यांच्या संयुक्त विद्यमाने पहिला राज्यस्तरीय 'चाचा नेहरू बालमहोत्सव 2025-26' चे आयोजन करण्यात आले आहे. हा तीन दिवसीय महोत्सव 28 ते 30 मार्च दरम्यान सिंहगड इन्स्टिट्यूटच्या प्रशस्त मैदानावर उत्साहात पार पडणार आहे.

या महोत्सवात विविध क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचा समावेश करण्यात आला असून, धावणे (रनिंग), लांब उडी, रिले, कबड्डी, खो-खो यांसारख्या खेळांसह चित्रकला, निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर आणि समूह नृत्य अशा विविध स्पर्धा तीन दिवस रंगणार आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून सहभागी होणाऱ्या बालकांना या माध्यमातून आपली कला व क्रीडा प्रतिभा सादर करण्याची संधी मिळणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी (28 मार्च) सायंकाळी 5 वाजता होणार असून, महिला व बालविकास विभाग (महाराष्ट्र राज्य) चे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुक्त नयना गुंडे राहणार असून, प्रमुख पाहुण्यांमध्ये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह सिंहगड इन्स्टिट्यूट, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय




नवले यांची उपस्थिती राहणार आहे.

या पहिल्या राज्यस्तरीय बालमहोत्सवात महिला व बालविकास विभाग अंतर्गत 36 जिल्ह्यातील कार्यरत विविध बालगृहातील सुमारे 900 स्पर्धक सहभागी होणार असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण 1200 जणांचा सहभाग अपेक्षित आहे. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. या महोत्सवाचे नियोजन संजय माने (मुख्य कार्यक्रमाधिकारी तथा विभागीय उपआयुक्त, महिला व बालविकास, पुणे विभाग - नोडल अधिकारी) तसेच डॉ. विजय खोमणे (जिल्हा महिला व बालविकास अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये यापूर्वीही अशा मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. प्रथमच पहिला राज्यस्तरीय बाल महोत्सव आयोजित करण्याचा मान सोलापूर जिल्ह्याला मिळालेला आहे. सुमारे 90 एकर परिसरात विस्तारलेला सुसज्ज कॅम्पस, प्रशस्त मैदान, उत्तम पायाभूत सुविधा आणि पार्किंग व्यवस्था यामुळे शासनाच्या विविध कार्यक्रमांसाठी या संस्थेला नेहमीच प्राधान्य दिले जाते.